# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दिनांक २४ जानेवारी २०१९

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | ५२/२०१९ भादविसंक २७९,३०४-अ,३३७,३३८,४२७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | २०/०१/२०१९ रोजी ०४.४५ वा चे सुमारास अंबर हॉटेल ते आसरा ब्रिजकडे जात असताना ए.डी.जोशी पेट्रोल पंप जुळे सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | २३/०१/२०१९ रोजी ०१.०५ वा |
| फिर्यादी | : | नासिरखान हसनखान पठाण वय-५३ वर्ष रा.२२३,होटगी रोड,आनंद नगर मजरेवाडी, सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | इम्तियाज रूकुम पटेल वय-३५ वर्ष रा.इंडी जिल्हा-विजापूर राज्य-कनार्टक |
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यात दि.२०/०१/२०१९ रोजी दुपारी ०४.४५ वा चे सुमारास माझी मुलगा आयेशा व तिची मैत्रिण अंबिका गंगदे असे दोघी ॲक्टिव्हा मोटार सायकल क्रं.एमएच-१३-डीसी-५३०२ वरून अंबर हॉटेल ते आसरा ब्रिजकडे जात असताना ए.डी.जोशी पेट्रोल पंप जुळे सोलापूर समोर एका हिरव्या रंगाचा जॉन डियर कंपनीचा त्याचा क्रं.के.ए.२८- टी.डी-०६९७ ट्रॅक्टरचा चालक नामे इम्तियाज रूकुम पटेल रा.इंडी जिल्हा-विजापूर राज्य-कनार्टक याने अंबर हॉटेल जुळे सोलापूर कडुन त्याच्या ताब्यातील वरील नमुद ट्रॅक्टर भरधाव वेगाने चालवुन बेदरकारपणे निष्काळजीपणाने ओव्हरटेक करीत असताना माझी मुलगी बसलेल्या तिच्या मैत्रिणीच्या मोटार सायकलला उजव्या बाजुने धडक दिल्याने निची मैत्रिण अंबिका गंगदे हिस दुखापत करून माझी मुलगी आयेशा पठाण हिचे उजवा पाय, मांडी व शरीराच्या उजव्या बाजुवरून ट्रॅक्टरच्या इंजिनचे डाव्या बाजुचे मागचे टायर गेल्याने तिला जबर दुखापत होवुन तिच्या मृत्यूस कारणीभुत होणेस व सदर मोटार सायकलचे नुकसानास कारणीभुत ठरलेल्या नमुद ट्रॅक्टर चालकाविरूध्द फिर्याद आहे तपास:- सपोनि/साळुंखे |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | ५३/२०१९ भादविसंक ३७९ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | २२/०१/२०१९ रोजी ०८.०० वा चे सुमारास सात रस्ता ते आसरा चौक सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| गु. दा. ता.वेळ | : | २३/०१/२०१९ रोजी ०१.५६ वा |
| फिर्यादी | : | अशोक हरिभाऊ देशपांडे वय-६० वर्ष रा.सी-२४,बाम्बे पार्क,जुळे , सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | अनोळखी |
| गेला माल | : | १) ४०००/-रू रोख दोन हजार रू दराचे भारतीय चलनाचे ०२ नोटा<br>२) २५०००/-रोख पाचशे रू दराचे भारतीय चलनाचे ५० नोटा<br>३) १०००/-रू रोख दोनशे रू दराचे भारतीय चलनाचे ०५ नोटा<br>४) ८०००/- रोख शंभर रू दराचे भारतीय चलनाचे ८० नोटा<br>५) १०००/-रोख पन्नास रू दराचे भारतीय चलनाचे २० नोटा<br>६) १००/-रोख वीस रू दराचे भारतीय चलनाचे ०५ नोटा<br>७) ९००/- रोख दहा रू दराचे भारतीय चलनाचे ९० नोटा<br>**एकुण ४००००/-रू** |
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यात दि.२२/०१/२०१९ रोजी रात्रौ अंदाजे ०८.०० ते ०८.२० वा चे दरम्यान एस.टी.स्टॅण्ड सोलापूर येथुन राहते घराकडे रिक्षामधुन(रिक्षा नंबर माहित नाही) प्रवास करीत असताना सात रस्ता सोलापूर या ठिकाणी आलेवर रिक्षामधील प्रवासी हे सरकासरकी करू लागल्याने बसण्याचे जागेच्या अडचणीमुळे मी माझ्या हातातील हॅण्डबॅग ही माझ्या दोन्ही पायाचे मधोमध रिक्षामध्ये खाली ठेवलेनंतर लोकमत पेपर एजंटकडुन वसुल करून हॅण्डबॅग मध्ये ठेवलेली वर नमुद रक्कम ही सात रस्ता ते आसरा चौक सोलापूर दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने माझे संमती वाचुन लबाडीने काढुन घेवुन चोरून नेलेली आहे तपास:- पोना/६०२ राठोड |

**सदर बझार पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | ६४/२०१९ भादविसंक ३९४,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | २२/०१/२०१९ रोजी १४.३० वा चे रेवणसिध्देश्वर मंदीर जवळ जनावर बाजाराच्या ठिकाणी सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | २३/०१/२०१९ रोजी २०.१८ वा |
| फिर्यादी | : | सुरेश बसु हेगडे वय-२८ वर्ष रा.गणेश नगर तांडा,देगाव ता.उ.सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | १) सिध्दु मनोहर गायकवाड २) अंबादास जाधव ३) राजु गायकवाड<br>२) ४) एक अनोळखी इसम रा सर्व.सेंटलमेन्ट कॉलनी सोलापूर |
| गेला माल | : | १,००,०००/-रू रोख रक्कम |

| | | |
|---|---|---|
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी,यातील आरोपी मजकुर यांनी जनावराच्या व्यवहाराच्या ठिकाणी जुगार खेळण्याचे नाटक करून फिर्यादी यांच्याशी भांडण  करून फिर्यादी व फिर्यादी यांचे वडील बसू ,भाऊ विकास यांना शिवीगाळ करून हॉकी स्टीक ने सायकलची चैन ने व काठीने मारहाण करून भाऊ विकास यांचे उजवे खिशातील रोख रक्कम एक लाख रूपये जबरदस्तीने चोरून नेले आहे तपास:- सपोनि/माशाळ |